# अहवाल सत्र २०१४–१५

## राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.)

यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धाचे संस्थापक अध्यक्ष स्व. दाआजी उपाख्य बापूरावजी देशमुख यांच्या दूरदर्शी विचारसरणीतून साकार झालेल्या अनेक शैक्षणिक उपक्रमांपैकी एक असलेले देवळी या गावांतील एस.एस.एन.जे. महाविद्यालय, या परिसरातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी नावाजलेले आहे. सर्व आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत. समाजसेवेचे व्रत स्वीकारलेल्या या महाविद्यालयात सन १९८७-८८ पासून राष्ट्रीय सेवा योजना कार्यरत आहे. समाजोपयोगी अनेक उपक्रम या योजनेच्या माध्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सोबत घेवून राबविले जात आहेत.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचा शैक्षणिक सत्र २०१४–१५ चा अहवाल महाविद्यालयाच्या स्मरणिकेकरिता सादर करतांना अत्यंत आनंद होत आहे. नियमित कार्यक्रम आणि विशेष श्रमसंस्कार शिबीर अशा दोन विभागांमध्ये वर्षभर चालणा–या कार्यक्रमांची विभागणी करण्यात येते. नियमित घेण्यात येणा–या कार्यक्रमांमध्ये शैक्षणिक सत्राच्या सुरूवातीला दिनांक ११ जुलै २०१४ ला जागतिक लोकसंख्या दिवस घेण्यात आला. 'लोकसंख्यावाढीचे दुष्परिणाम' या संकल्पनेवर आधारित एक रॅली काढण्यात आली. दिनांक २६ जुलै हा दिवस स्व. दाआजी उपाख्य बापूरावजी देशमुख यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम घेवून साजरा करण्यात येतो, या दिवशी गुरूदेव सेवा मंडळाचे प्रचारक श्री. बा. दे. हांडे यांच्या उपस्थितीत सामुहिक प्रार्थना घेवून स्व. दाआजींना आदरांजली अर्पण करण्यात आली. तसेच रा.से.यो. च्या माध्यमाने महाविद्यालय परिसरात ११ वृक्षांची मान्यवरांच्या हस्ते लागवड करण्यात आली. दिनांक १ ऑगस्टला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य टिळक पुण्यतिथीचा कार्यक्रम घेण्यात आला, यानिमित्ताने एक वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. दिनांक ९ ऑगस्ट क्रांती दिनाच्या निमित्ताने व्याख्यानाचा कार्यक्रम घेण्यात आला. दिनांक ११ ऑगस्ट रोजी प्रा. सुरेशराव देशमुख प्रतिष्ठानच्यावतीने यशवंत महाविद्यालयातील रा.से.यो. च्या २६ स्वयंसेवकांनी रक्तदान करून आपले योगदान नोंदविले. दिनांक १३ ऑगस्ट जागतिक युवा दिनाच्या निमित्ताने एच.आय.व्ही. जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. रा.से.यो.च्या रेड–रिबन क्लब आणि ग्रामीण रूग्णालय, भिडी यांच्या संयुक्त विद्यमाने राबविलेल्या या कार्यक्रमात एच. आय. व्ही. एडस् संबंधी डॉक्टर मंडळींनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. तसेच विविध स्पर्धा घेण्यात आल्या. दिनांक २४ ऑगस्टला पथक पदूघाटन कार्यक्रम घेण्यात आला, यावेळी रा.से.यो.च्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा घेतला गेला. दिनांक ८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवसाचे औचित्य साधून 'साक्षरतेचे देशाला विकसीत करण्यासाठी होणारे फायदे' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. दिनांक १४ सप्टेंबर ला आनंदवन, वरोरा येथे रा. से. यो. च्या स्वयंसेवक–स्वयंसेविकांची एक अभ्यास सहल आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये १५० विद्यार्थी सहभागी झाले. आनंदवन येथे स्वयंसेवकांनी श्रमदानाचे काम केले. महारोगी सेवा समितीचे सचिव डॉ. विकास आमटे यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांचे कौतुक केले तसेच त्यांना मार्गदर्शन केले. दिनांक २४ सप्टेंबर

हा दिवस राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. ग्रामीण रूग्णालय, भिडी येथिल वैद्यकीय अधीक्षक डॉ. दिनेश राठोड यांना मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात आले होते. दिनांक २४ सप्टेंबर ते १ ऑक्टोंबर पर्यंत युवा-वेध सप्ताह साजरा करण्यात आला ज्यामध्ये वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, भावगीत स्पर्धा इत्यादि कार्यक्रम घेण्यात आले. २ ऑक्टोबर हा दिवस महात्मा गांधी यांची जयंती 'शांती दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी महाविद्यालयात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली तसेच उपविभागीय अधिकारी, वर्धा यांच्या मार्गदर्शनात वर्धा येथे मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. त्यामध्ये रा. से.यो. च्या विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभाग नोंदविला. दिनांक २६ नोंव्हेंबरला भारतीय संविधान दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले तसेच प्रा. डॉ. गणेश मालधुरे यांनी मार्गदर्शन केले. दिनांक २० डिसेंबर ला संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम घेण्यात आला. आमंत्रित मान्यवरांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्याचा एकूण आढावा घेतला. दिनांक ३ जानेवारी सवित्रीबाई फुले यांची जयंती ' महिला मुक्ती दिन' म्हणून साजरी करण्यात आली. सामाजिक क्षेत्रात कार्य करणा-या महिला वक्त्यांना पाचारण करून त्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. दिनांक ७ जानेवारी २०१५ ला महाराष्ट्र पोलीस रायझींग सप्ताह अंतर्गत महाविद्यालयात कार्यक्रम आयोजित करण्यात आला. 'महिला सुरक्षा व सायबर सिक्युरिटी' या विषयावर तज्ञ मंडळींनी मार्गदर्शन केले. दिनांक १९ फेब्रुवारी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त देवळी गावामध्ये जावून रा.से.यो. च्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळया विषयांवर पथनाटय सादर केलीत. दिनांक २ मार्चला 'वृक्ष वाचवा, वृक्ष जगवा' अभियान राबविण्यात आले. होळी या सणाच्या निमित्ताने मोठया प्रमाणात होणा-या वृक्षांच्या कत्तलीपासून समाजास दूर ठेवण्याच्या हेतूने एका रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये वृक्षांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने वेगवेगळया घोषणा देण्यात आल्यात. दिनांक २३ मार्च ला शहिद दिन तसेच बलिदान दिन साजरा करण्यात आला या निमित्ताने आमंत्रित मान्यवरांनी रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## विशेष कार्यक्रम –

दैनिक सकाळ वृत्तसमुहाच्या वतीने 'जल साक्षरता दिंडी' राज्यभर काढण्यात आलेली होती. ही दिंडी देवळी शहरातून फिरविण्यात आली. दिनांक ३० ऑगस्ट २०१४ ला झालेल्या या कार्यक्रमात रा.से.यो. च्या स्वयंसेवक-स्वयंसेविकांनी आपला सक्रीय सहभाग नोंदविला. दिनांक २० ऑक्टोबर ला महाविद्यालयातील रा.से.यो. विभागाने दत्तक घेतलेल्या डिगडोह, ता. देवळी या गावात ग्राम स्वच्छता आणि वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. अनेक मान्यवरांसोबतच गावक-यांनी आमच्या या उपक्रमाचे कौतुक केले. देवळी या शहरात शारदीय नवरात्र मोठया उत्साहात साजरे करण्यात येते. या उत्सवा दरम्यान खाद्यपदार्थाचे वाटप लंगरच्या माध्यमाने भाविकांसाठी केले जाते. हे पदार्थ प्लास्टीकच्या प्लेटसूमध्ये देण्यात येतात. खाद्यपदार्थ खाऊन झाल्यावर खाली झालेल्या या प्लास्टीकच्या प्लेटस् इतरत्र फेकण्यात येतात त्यामुळे मोठया प्रमाणात कचरा होतो, ज्याकडे सर्वांचे दुर्लक्ष होते, हे ओळखून महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागाने पुढाकार घेवून आपल्या स्वयंसेवकांच्या माध्यमाने हा प्लास्टीकचा कचरा संकलित करून तो नष्ट करण्याचा उपक्रम या कालावधीत

राबविला. डिगडोह येथे दरवर्षी श्री. नागनाथ महाराजांची यात्रा भरविण्यात येते, या यात्रेमध्ये रा.से.यो. च्या माध्यमाने श्रमदानाचे कार्य केले गेले. या वर्षी डेंग्यु या आजाराने वर्धा जिल्हयात मोठया प्रमाणात थैमान माजविले होते. या आजाराबाबत ग्रामीण भागात मोठया प्रमाणात अज्ञान आढळून आले. अनेक रूग्णांचा मृत्यु सुध्दा झालेला होता, ही समस्या ओळखून ग्रामीण रूग्णालय, भिडीचे वैद्यकिय अधीक्षक डॉ. दिनेश राठोड यांच्या कडून काही स्वयंसेवकांना प्रशिक्षित करून घेतले. या स्वयंसेवकांचे गट तयार करून ग्रामीण भागात सायंकाळच्यावेळी जाऊन जनतेला या आजाराबाबत माहिती देण्यात आली, त्यामध्ये हा आजार होवू नये यासाठी घेण्यात येणारी काळजी, हा आजार कसा होतो, जर आजार झाला तर काय उपाय करायला हवा इत्यादिबाबत आमच्या महाविद्यालयातील रा.से.यो. विभागाने स्तृत्य उपक्रम राबविला, त्याची दखल वैद्यकिय क्षेत्रात घेण्यात आली.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करून विद्यार्थ्यांना भविष्यात वेगवेगळया स्पर्धा परीक्षांमध्ये यश कसे मिळवावे याची माहिती देण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे सात दिवसीय राज्यस्तरीय नेतृत्व प्रशिक्षण शिबीर, 'प्रेरणा-२०१४' या नावाने आयोजित करण्यात आले होते, त्यामध्ये महाविद्यालयातील रा.से.यो.च्या दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, या शैक्षणिक वर्षाचे दरम्यान रा.से.यो. च्या वतीने प्रत्येक रविवारला प्लास्टीक निर्मूलन, गाजर गवत निर्मूलन तसेच सामाजिक विषय घेवून मान्यवरांना आमंत्रित करून उद्‌बोधन व मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित केले गेले.

## विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीर -

देवळी तालुक्यातील भिडी या गांवी जिल्हा परिषद, वर्धा यांच्या विनंतीनुसार दिनांक ५ ते १२ डिसेंबर २०१४ या कालावधीत महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागाने विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीर आयोजित केले होते.

'स्वच्छतेसाठी युवक' या संकल्पनेवर आधारित या शिबीरामध्ये विविध ग्रामोपयोगी कार्य करण्यात आले. ज्यामध्ये गावातील नाल्यांची स्वच्छता, गावातील शौचालयांची माहिती संकलीत करणे, हागणदारी मुक्त गाव करण्यासाठी गावक-यांना प्रबोधन करून घरी शौचालय बांधण्याबाबत प्रेरित करणे, ग्राम स्वच्छतेचे महत्व गावक-यांना पटवून सांगणे, अंधः श्रध्दानिर्मूलनार्थ विविध कार्यक्रम राबविणे, ज्यामध्ये गावक-यांचे प्रबोधन मान्यवर प्रबोधनकारांचे मनोरंजनात्मक कार्यक्रम घेवून करणे, स्त्रीभ्रुण हत्येसंबंधी प्रबोधन, गांवात कचरा कुंडयांचे व्यवस्थापन करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कशी असावी याबाबत गांवक-यांना माहिती देणे, वृक्षारोपण व संवर्धनार्थ योगदान तसेच जिल्हा परिषद वर्धा यांनी पुरविलेल्या वेगवेगळया साहित्यांच्या मार्फत गावक-यांना स्वच्छते विषयीची माहिती देण्यात आली.

गावक-यांच्या आरोग्याविषयी कार्यक्रम घेण्यात आला, ग्रामीण रूग्णालय, भिडी यांच्या सहकार्याने सिकलसेल तपासणी, रक्तगट तपासणी, नेत्र रोग तपासणी, रक्तदाब, हदय रोग निदान, एच.आ.व्ही, एडस् सबंधीची तपासणी इत्यादि आरोग्यविषयक तपासणी करण्यात आली. तसेच रक्तदान शिबीर घेण्यात आले ज्यामध्ये एकूण २१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. महिला मेळावा घेण्यात आला, या मेळाव्यामध्ये स्त्रियांना त्यांच्या आजाराबाबत मार्गदर्शन करण्यासाठी कस्तुरबा हेल्थ

सोसायटी मधील महिला डॉक्टरांच्या चमूला आमंत्रित करण्यात आले होते, त्यांनी या महिला मेळाव्यात आलेल्या महिलांना मार्गदर्शन केले. तसेच महिला सशक्तीकरणा अंतर्गत बचत गटाच्या माध्यमाने कशा प्रकारे उद्योग करून आपले आर्थिक उत्पन्न वाढवू शकतो या विषयी मार्गदर्शन करण्यात आले, त्यासाठी बँका कर्ज पुरवठा कशा प्रकारे करतात. याची माहिती देण्यासाठी बँकांमधील अधिकारी वर्गांना आमंत्रित केले होते. विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीरामध्ये या व्यतिरिक्त सुध्दा लोकापयोगी आणि मार्गदर्शक कार्यक्रम राबविण्यात आले. भिडी या गावालगत असलेल्या आदिवासी तांडा वस्तीवर जावून शिबीरार्थी विद्यार्थ्यांनी त्यांना स्वच्छते विषयी माहिती दिली, तसेच शिक्षणाचे महत्व पटवून सांगून आपल्या पाल्यांना शाळेत पाठविण्याबाबत प्रेरित करण्याचा प्रयत्न केला, या उपक्रमा दरम्यान आदिवासी जीवनशैलीचा शिबीरार्थींनी अभ्यास केला.

या शिबीराच्या माध्यमाने भिडी या गावात या कालावधीत जे विविध कार्यक्रम घेण्यात आले तसेच कार्य करण्यात आले याची दखल गावक-यांनी घेतली. शिबीराकरिता त्यांनी खूप चांगले सहकार्य केले, तसेच या गावातील सरपंच, ग्रामसेवक, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक व समाजसेवक यांनी महाविद्यालयाच्या या उपक्रमाची खुप प्रशंसा करून, या शिबीरामुळे आमच्या गावातील रहिवाश्यांच्या मानसिकतेत नक्कीच बदल होईल आणि आम्हाला सुध्दा गाव विकासाचे काम करणे आता सहज शक्य होईल असा विश्वास दर्शविला.

**प्रा.डॉ. गोपाल वि. हेलोंडे**

**कार्यक्रम अधिकारी**

**राष्ट्रीय सेवा योजना**



महाविद्यालयाच्या रासेयो विभागाने दत्तक घेतलेल्या डिगडोह, ता.देवळी येथे ग्राम–स्वच्छता आणि वृक्षा रोपण कार्यक्रम राबवितांना स्वयंसेवक–स्वयंसेविका



महाविद्यालयाच्या रासेयो विभागाने दत्तक घेतलेल्या डिगडोह, ता.देवळी येथे ग्राम–स्वच्छता आणि वृक्षा रोपण कार्यक्रम राबवितांना स्वयंसेवक–स्वयंसेविका



महाविद्यालयाच्या रासेयो विभागाने दत्तक घेतलेल्या डिगडोह, ता.देवळी येथे ग्राम–स्वच्छता आणि वृक्षा रोपण कार्यक्रम राबवितांना स्वयंसेवक–स्वयंसेविका



महाविद्यालयाच्या रासेयो विभागाने दत्तक घेतलेल्या डिगडोह, ता.देवळी येथे ग्राम–स्वच्छता आणि वृक्षा रोपण कार्यक्रम राबवितांना स्वयंसेवक–स्वयंसेविका



महाविद्यालयाच्या रासेयो विभागाने दत्तक घेतलेल्या डिगडोह, ता.देवळी येथे ग्राम–स्वच्छता आणि वृक्षा रोपण कार्यक्रम राबवितांना स्वयंसेवक–स्वयंसेविका



महाविद्यालयाच्या रासेयो विभागाने दत्तक घेतलेल्या डिगडोह, ता.देवळी येथे ग्राम–स्वच्छता आणि वृक्षा रोपण कार्यक्रम राबवितांना स्वयंसेवक–स्वयंसेविका



रासेयो विभागाने महाविद्यालयात घेतलेल्या एच.आय.व्ही.एडस् जनजागृतीपर कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना डॉ.विजय ओझा



रासेयो विभागाने महाविद्यालयात घेतलेल्या एच.आय.व्ही.एडस् जनजागृतीपर कार्यक्रमात सामुहीक शपथ घेतांना




रासेयो विभागाने महाविद्यालयात घेतलेल्या एच.आय.व्ही.एडस् जनजागृतीपर कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना डॉ.आगलावे



सुरेश देशमुख सेवा प्रतिष्ठाण, वर्धाच्या वतीने आयो‍ यशवंत महाविद्यालय, वर्धा येथिल मेगा रक्तदान शिबीरा रक्तदान करतांना स्वयंसेवक



सुरेश देशमुख सेवा प्रतिष्ठाण, वर्धाच्या वतीने यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे आयोजित भव्य रक्तदान शिबीरामध्ये रक्तदान केलेले स्वयंसेवक आणि कर्मचारी




महाविद्यालयाची पालक संस्था यशवंत ग्रामीण शिक्षण सं संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय दाआजी उपाख्य बापूरा देशमुख यांच्या पुण्यतिथि निमित्त वृक्षा रोपण कर रासेयो चे स्वयंसेवक–स्वयंसेविका





भिडी येथे घेण्यात आलेल्या रासेयोच्या विशेष निवासी श्रम संस्कार शिबीरात मनोरंजनातून प्रबोधन करतांना चिकणी–जामणी येथिल प्रबोधनकार श्री.प्रशांत कुमरे व त्यांचे सहकारी




भिडी येथे घेण्यात आलेल्या रासेयोच्या विशेष निवासी श्रम संस्कार शिबीरात मनोरंजनातून प्रबोधन करतांना मोर्शी येथिल प्रबोधनकार श्री.विद्याराज कोरे व त्यांचे सहकारी



भिडी येथे घेण्यात आलेल्या रासेयोच्या विशेष निवासी श्रम संस्कार शिबीरात ग्राम स्वच्छतेचा आणि अंधश्रद्धा विरोधक संदेश देतांना वैराग्यमुर्ती गाडगेबाबा सदृश वेश धारण केलेले प्रबोधनकार श्री.विद्याराज कोरे



भिडी येथे घेण्यात आलेल्या रासेयोच्या विशेष निवासी श्रम संस्कार शिबीरात ग्राम स्वच्छता करतांना शिबीरार्थी स्वयंसेवक–स्वयंसेविका






भिडी येथे घेण्यात आलेल्या रासेयोच्या विशेष निवासी श्रम संस्कार शिबीरात ग्रामीण रूग्णालय, भिडी यांच्या सहकार्याने आरोग्य शिबीर आणि रक्तदान शिबीर घेण्यात आले या प्रसंगी रेड–रिबन–क्लबचे पदाधिकारी व तज्ञ मंडळी

भिडी येथे घेण्यात आलेले रासेयोचे विशेष निवासी श्र संस्कार शिबीर हे जिल्हा परिषद, वर्धा यांच्या मार्गदर्श तत्वानुसार घेण्यात आले, यामध्ये गावकऱ्यांना विवि साहित्यांचा उपयोग करून कसे प्रबोधन करावे याचे प्रशिक्ष देतांना जि.प.चे पदाधिकारी श्री.खोब्रागडे





भिडी येथे घेण्यात आलेले रासेयोचे विशेष निवासी श्रम संस्कार शिबीर हे जिल्हा परिषद, वर्धा यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार घेण्यात आले, यामध्ये जि.प.वर्धा यांनी पुरविलेल्या विविध साहित्यांचा उपयोग करून माहिती देतांना स्वयंसेवक–स्वयंसेविका

भिडी येथे घेण्यात आलेले रासेयोचे विशेष निवासी श्र संस्कार शिबीर हे जिल्हा परिषद, वर्धा यांच्या मार्गदर्श तत्वानुसार घेण्यात आले, यामध्ये जि.प.वर्धा यांनी पुरविलेल विविध साहित्यांचा उपयोग करून माहिती देतां स्वयंसेवक–स्वयंसेविका



भिडी येथे घेण्यात आलेले रासेयोचे विशेष निवासी श्रम संस्कार शिबीर हे जिल्हा परिषद, वर्धा यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार घेण्यात आले, यामध्ये जि.प.वर्धा यांनी पुरविलेल्या विविध साहित्यांचा उपयोग करून माहिती देतांना स्वयंसेवक–स्वयंसेविका



भिडी येथे घेण्यात आलेल्या रासेयोच्या विशेष निवासी श्रम संस्कार शिबीरात महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, या मेळाव्यात महिलांना व स्वयंसेविकांना मार्गदर्शन करतांना कस्तुरबा हेल्थ सोसायटी, सेवाग्राम येथिल डॉ.मानसी भगत



भिडी येथे घेण्यात आलेल्या रासेयोच्या विशेष निवासी श्रम संस्कार शिबीरात महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, या मेळाव्यात महिलांशी व स्वयंसेविकांशी संवाद साधतांना कस्तुरबा हेल्थ सोसायटी, सेवाग्राम येथिल डॉ. मानसी भगत



भिडी येथे घेण्यात आलेल्या रासेयोच्या विशेष निवासी श्रम संस्कार शिबीरात महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, या मेळाव्यात महिलांना व स्वयंसेविकांना मार्गदर्शन करतांना ग्रामीण रूग्णालय, भिडी येथिल डॉ.सौ.राऊत



केशोर बुरे, कुमूद
...तूजा वसंत गंभीर
...ट रोजी पालक मंत्री
... यांच्या हस्ते
...वीन सोना, उदय
...क्रपालन अधिकारी
, जिल्हा समादेशक
प्रमुख उपस्थितीत
... जिल्हा मुख्य
...रीष गोडे, अमृत
... वाडई, सुवर्णमाला
...मोहता, सोनवने,
...आर.बावने, प्रकाश
...ली ...अवघडे, किरण
पदाधिकारी यांनी
...ले. मुख्याध्यापिका
...फ्लॉक लिडर निर्मला
...व कब-बुलबुला
...ले. हे सर्व ग्रामीण
बुलबुल असून सर्वत्र
...हे.

हॉस्पीटल येथे सात दिवसीय स्तनपान सप्ताह निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी कॉटेज हॉस्पीटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ.दूधे तसेच प्रमुख अतिथी म्हणून डॉ.एल. देशमुख, डॉ.आर.नानोटकर, लिडबे, क्षमा बांबल (भौतिकोपचार) डॉ.सागर कारवटकर (बालरोग तज्ञ), डॉ.खेडकर (स्त्रीरोग तज्ञ), इनरव्हिल

यांनी योग्य स्तनपा... स्वच्छता कशी राखावी कितीवेळा स्तनप... आदीबाबींवर उपयुक्त...

तसेच बाबल यां... गर्भवतींनी ७ व्या महि... कोणते व्यायाम करा... बाळ व आई यांचे आरो... याची माहिती दिली.

बाळाच्या लर्स...

देशोन्नती
२ | वर्धा
गुरूवार, दि. २१ ऑगस्ट २०१४



...वारी, चोरडीया, ...ब, ललिता बेले, ...ा हुरकट, माधुरी, ...ता राका, संतोष ...रा, इंदू कोचर, ट्रेझरर आरती दौलतकर, प्रिती तत्रा, मुंदडा, छाया लाहोटी, नेहा, सुनिता, उषा, कोमल मोटवानी, साधना घुसे, आभा कुलकर्णी, कुमूद व्यास आदींसह अनेकांनी परिश्रम घेतले.



हिंगणी : येथील यशवंत विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी ए.डी.गीरडे यांची नियुक्ती झाली. ते आज २० रोजी विद्यालयात रुजू झाले. गीरडे यांची मुख्याध्यापकपदी नियुक्ती केल्याबद्दल पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. गीरडे यांनी यापूर्वी याच शाळेत पर्यवेक्षक व उपमुख्याध्यापक म्हणून काम पाहीले आहे. २ जुले २०१२ ला शाळेत रुजू झाल्यापासून गीरडे यांची शाळेविषयी असलेली तळमळ व पालकासोबत असलेला सुसंवाद यामुळे स्थानिक पालकांच्या वतीने संचालक प्रा.डॉ. किशोर अहेर यांचे वतीने संस्था अध्यक्ष प्रा. आ.सुरेश देशमुख याना विनंती करुन गीरडे यांना मुख्याध्यापक म्हणून ठेवावे अशी विनंती केली होती. त्याची दखल घेत व्यवस्थापनाने गीरडे यांना २० ऑगस्ट पासून हिंगणी येथे मुख्याध्यापक म्हणूने काम पाहण्याचे पत्र दिले. त्यांच्या नियुक्तीबद्दल जयेश रणनवरे, पी.पी.कुकडे, तारका कटकर, दिलीप गावंडे आदींनी अभिनंदन केले.

# एचआयव्ही.एड्स जनजागृतीपर कार्यक्रम

## एस.एस.एन.जे. कॉलेज आणि ग्रामीण रुग्णालय भिडी यांचा संयुक्त उपक्रम

*प्रतिनिधी / २० ऑगस्ट*

**वर्धा :** देवळी येथील एस.एस.एन.जे. महाविद्यालयामधील राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत रेड रिबन क्लब आणि ग्रामीण रुग्णालय, भिडी यांनी संयुक्तरित्या आंतरराष्ट्रीय युवा करुन समाजात तशी जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात या विषयावर पोस्टर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि घोषणा वाक्य स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती.

स्पर्धेमध्ये यशस्वी आणि सहभागी विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाध्यक्ष मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. गणेश मालधुरे उपस्थित होते तर अतिथि जिल्हा कार्यक्रम अधिकारी शिवा देवगडे तर मार्गदर्शक म्हणून डॉ.उज्वला कांबळे, डॉ.सीमा खान, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.गोपाल हेलोंडे, समुपदेशक विजय ओझा, प्रयोगशाळा तज्ञ माधुरी भोयर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस एडस् संबंधी सामुहीक शपथ घेण्यात आली. अध्यक्षीय भाषणात डॉ.मालधुरे यांनी संत महात्म्यांच्या विचारांची मांडणी करुन समाजास सत्वशिल तसेच नैतिकतेची शिकवण त्यांनी या काळात कशी दिली हे सांगितले. प्रमुख पाहुणे शिवा देवगडे यांनी एच.आय.व्ही. होण्याच्या कारणांना स्पष्ट केले तसेच त्यांची लक्षणे कशी ओळखली जातात यांची माहिती दिली. युवक युवतींनी संयमी असायला हवे असे आवाहन केले. डॉ.उज्वला कांबळे आणि डॉ.सिमा खाने यांनी विद्यार्थ्यांमध्ये एच.आय.व्ही.ची लागण वाढत्या व्यसनाधिनतेमुळे होते, तसेच याकरीता पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करण्याची युवकांची सवय कशी कारणीभूत आहे, हे उदाहरणासह स्पष्ट केले. तर रोखण्यासाठी जनजागृती आणि कारणीभूत आहे, हे उदाहरणासह स्पष्ट केले. ते रोखण्यासाठी जनजागृती आणि योग्य आरोग्यविषयक माहिती आत्मसात करण्याचे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित पोस्टर, चित्रकला आणि घोषणा वाक्य स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र देण्यात आले. ज्यांमध्ये प्रथम पुरस्कार प्रांजली इंगळे, रश्मी सायंकार तर प्रोत्साहनपर पुरस्कार काजल देशमुख, पल्लवी बिजवार, श्रद्धा ठाकरे, प्रीती तिरकुट, लिनता खंडाळकर, त्रिशुल भोयर यांना देण्यात आले. प्रास्ताविक विजय ओझा यांनी केले, संचालन योगेश येनकर यांनी तर आभार श्रद्धा ठाकरे हिने मानले.

## कावडयात्रा सुरू

भति प्राचीन असून, भाविकांचे श्रद्धास्थान
ण महिन्यातील दर सोमवारी कावडयात्रा

त्रेची सुरुवात येथील सुरेश आईटालवार,
पेश गौरशेट्टीवार यांनी केली. दर सोमवारी
डीने पाणी आणून रुद्रेश्वराला जलाभिषेक
कावडयात्रेतील संख्या वाढतच आहे.
गी होतात. त्यामुळे येथे विविध धार्मिक
आहे.



# समाजाला नैतिकतेची शिकवण द्या : डॉ. मालधुरे

तभा वृत्तसेवा
देवळी, २१ ऑगस्ट

आज एडस्‌सारख्या समस्येने देशाला ग्रासले आहे. अशावेळी संत महात्म्यांच्या विचारांची मांडणी करून समाजाला सत्त्वशील तसेच नैतिकतेची शिकवण द्यावी, असे आवाहन प्रा. डॉ. गणेश मालधुरे यांनी केले.

ते स्थानिक एसएसएनजे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत रेड रिबन क्लब आणि ग्रामीण रुग्णालय भिडी, यांच्या वतीने एचआयव्ही एडस् संदर्भात मार्गदर्शन करताना बोलत होते.



व्यासपीठावर डॉ. उज्जवला कांबळे, प्रा. डॉ. गणेश मालधुरे, डॉ. सीमा खान, शिवा देवगडे, विजय ओझा व अन्य

अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. गणेश मालधुरे होते. प्रमुख अतिथी म्हणून शिवा देवगडे, डॉ. उज्ज्वला कांबळे, डॉ. सीमा खान, प्रा. गोपाल हेलोंडे, विजय ओझा, प्रयोगशाळा तंत्रज्ञ माधुरी भोयर यांची उपस्थिती होती.

शिवा देवगडे यांनी एचआयव्हीची कारणे स्पष्ट केली. युवक-युवतींनी संयमी असायला हवे, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. उज्जवला कांबळे आणि डॉ. सीमा खान यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्हीची लागण वाढत्या व्यसनाधिनतेमुळे होते तसेच याकरिता पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करण्याची युवकांची सवय कशी कारणीभूत आहे, हे उदारहणासह स्पष्ट केले. हे रोखण्यासाठी जनजागृती आणि आरोग्यविषयक माहिती आत्मसात करण्याचे आवाहन त्यांनी केले.

विजय ओझा यांनी एचआयव्हीपासून दूर राहण्याकरिता नैतिकता पाळा व एड्स टाळा असा संदेश दिला. गोपाल हेलोंडे यांनी देशाच्या प्रगतीकरिता सशक्त युवकांची आवश्यकता असते. परंतु, दुर्दैवाची बाब म्हणजे हेच युवक आज वाट चुकलेल्या स्थितीत आढळून येतात. वाढती व्यसनाधिनता याकरिता तेवढीच कारणीभूत आहे. त्यामुळे गावागावात पथनाट्य सादर करून एड्सबाबत समाजजागृती करण्याचे कार्य या महाविद्यालयातील रासेयो विद्यार्थी करीत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला एडस्‌बाबत सामूहिक शपथ देण्यात आली. कार्यक्रमाच्या निमित्ताने पोस्टर, चित्रकला आणि घोषवाक्य स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र देण्यात आले. प्रथम पुरस्कार प्रांजली इंगळे, रश्मी सायंकार तर प्रोत्साहनपर पुरस्कार काजल देशमुख, पल्लवी बिजवार, श्रद्धा ठाकरे, प्रीती तिरकुट, लिनता खंडाळकर, त्रिशूल भोयर यांना प्राप्त झाला.

प्रास्ताविक विजय ओझा यांनी केले. संचालन योगेश येनकर तर आभार श्रद्धा ठाकरे यांनी मानले. यशस्वितेसाठी माधुरी भोयर, कल्पना टोणपे, निखिल मेंढे, रवींद्र रोकडे, लीना बोबडे, दीपाली खडगे, प्रा. दिलीप दबडे, प्रा. धनराज मुंगल, प्रा. प्रभाकर ढाले, प्रशांत कुमरे आदिंनी

## …ावडयात्रा सुरू

…ति प्राचीन असून, भाविकांचे श्रद्धास्थान …ा महिन्यातील दर सोमवारी कावडयात्रा

…त्रेची सुरुवात येथील सुरेश आईटालवार, …ाश गौरशेट्टीवार यांनी केली. दर सोमवारी …ीने पाणी आणून रुद्रेश्वराला जलाभिषेक …ावडयात्रेतील संख्या वाढतच आहे. …ी होतात. त्यामुळे येथे विविध धार्मिक … आहे. ■

तरुण भारत
www.tarunbharat.net
आपलं वर्धा
शुक्रवार, २२ ऑगस्ट २०१४ | १२

# समाजाला नैतिकतेची शिकवण द्या : डॉ. मालधुरे

तभा वृत्तसेवा
देवळी, २१ ऑगस्ट

आज एडस्‌सारख्या समस्येने देशाला ग्रासले आहे. अशावेळी संत महात्म्यांच्या विचारांची मांडणी करून समाजाला सत्त्वशील तसेच नैतिकतेची शिकवण द्यावी, असे आवाहन प्रा. डॉ. गणेश मालधुरे यांनी केले.

ते स्थानिक एसएसएनजे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत रेड रिबन क्लब आणि ग्रामीण रुग्णालय भिडी, यांच्या वतीने एचआयव्ही एडस् संदर्भात मार्गदर्शन करताना बोलत होते.



व्यासपीठावर डॉ. उज्जवला कांबळे, प्रा. डॉ. गणेश मालधुरे, डॉ. सीमा खान, शिवा देवगडे, विजय ओझा व अन्य

अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. गणेश मालधुरे होते. प्रमुख अतिथी म्हणून शिवा देवगडे, डॉ. उज्ज्वला कांबळे, डॉ. सीमा खान, प्रा. गोपाल हेलोंडे, विजय ओझा, प्रयोगशाळा तंत्रज्ञ माधुरी भोयर यांची उपस्थिती होती.

शिवा देवगडे यांनी एचआयव्हीची कारणे स्पष्ट केली. युवक-युवतींनी संयमी असायला हवे, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. उज्जवला कांबळे आणि डॉ. सीमा खान यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्हीची लागण वाढत्या व्यसनाधिनतेमुळे होते तसेच याकरिता पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करण्याची युवकांची सवय कशी कारणीभूत आहे, हे उदारहणासह स्पष्ट केले. हे रोखण्यासाठी जनजागृती आणि आरोग्यविषयक माहिती आत्मसात करण्याचे आवाहन त्यांनी केले.

विजय ओझा यांनी एचआयव्हीपासून दूर राहण्याकरिता नैतिकता पाळा व एड्स टाळा असा संदेश दिला. गोपाल हेलोंडे यांनी देशाच्या प्रगतीकरिता सशक्त युवकांची आवश्यकता असते. परंतु, दुर्दैवाची बाब म्हणजे हेच युवक आज वाट चुकलेल्या स्थितीत आढळून येतात. वाढती व्यसनाधिनता याकरिता तेवढीच कारणीभूत आहे. त्यामुळे गावागावात पथनाट्य सादर करून एड्सबाबत समाजजागृती करण्याचे कार्य या महाविद्यालयातील रासेयो विद्यार्थी करीत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला एडस्‌बाबत सामूहिक शपथ देण्यात आली. कार्यक्रमाच्या निमित्ताने पोस्टर, चित्रकला आणि घोषवाक्य स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र देण्यात आले. प्रथम पुरस्कार प्रांजली इंगळे, रश्मी सायंकार तर प्रोत्साहनपर पुरस्कार काजल देशमुख, पल्लवी बिजवार, श्रद्धा ठाकरे, प्रीती तिरकुट, लिनता खंडाळकर, त्रिशूल भोयर यांना प्राप्त झाला.

प्रास्ताविक विजय ओझा यांनी केले. संचालन योगेश येनकर तर आभार श्रद्धा ठाकरे यांनी मानले. यशस्वितेसाठी माधुरी भोयर, कल्पना टोणपे, निखिल मेंढे, रवींद्र रोकडे, लीना बोवडे, दीपाली खडगे, प्रा. दिलीप दबडे, प्रा. धनराज मुंगल, प्रा. प्रभाकर ढाले, प्रशांत कुमरे आदिंनी सहकार्य केले. ■

सकाळ

३

कपाशी व तुरीच्या पिकाला पाण्याची गरज भासत आहे. बोर प्रकल्पातील पाणी कपाशी व तुरीच्या पिकांकरिता देण्यात यावे, यासाठी केळझर येथील शेतकऱ्यांनी अभियंत्यांना निवेदन दिले.

यावर्षी मृगनक्षत्रात पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांना दुबार तिबार पेरणी करावी लागल्याने शेतकऱ्यांना

# 'सामाजिक आरोग्याची काळजी घेणे स्वयंसेवकांचे कर्तव्य'

**वर्धा, ता. ३० :** राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी ग्रामीण भागातील समाजाला त्यांच्या आरोग्याविषयी जागृत केले पाहिजे. महाविद्यालयीन युवक-युवतींमध्ये ऊर्जा असते, या ऊर्जेचा विधायक कार्यासाठी उपयोग केला तर त्याचे चांगले परिणाम दिसून येतील, असे विचार डॉ. दिनेश राठोड यांनी येथे व्यक्त केले.

एसएसएनजे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचा वर्धापनदिन आणि युवा सप्ताहाचे उद्‌घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून गृहरक्षक दलाचे जिल्हा समादेशक प्रा. मोहन गुजरकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. गणेश मालधुरे होते. प्रा. गोपाल हेलोंडे, प्रा. माधुरी देशमुख आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती. डॉ. राठोड पुढे म्हणाले. रूग्णालयातर्फे आम्ही समाजाची सेवा करतो, परंतु समाजाला विविध आजारांबाबत घ्यावयाची काळजी व स्वच्छतेचे महत्त्व पटवून देऊन स्वयंसेवकांनी त्यांना जागृत केले तर सुंदर समाज निर्माण होऊ शकतो, असेही ते म्हणाले. श्री गुजरकर म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना आणि एनसीसी हे महाविद्यालयातील असे मंच आहेत की, या माध्यमातून आपण देशाची आणि समाजाची सेवा करू शकतो. स्वामी विवेकानंदांना भारतातील जो युवक अपेक्षित होता. तो या माध्यामाने निर्माण होऊ शकतो. डॉ. मालधुरे म्हणाले, युवक-युवतींनी प्रतिभावंत लेखकांचे साहित्य वाचून त्यातील चांगल्या गोष्टी आत्मसात कराव्या. त्यांनी अनेक दाखले देऊन युवकांनाच दृष्टीसमोर ठेवून साहित्य लिहिले, असेही ते म्हणाले. प्रास्ताविक प्रा. गोपाल हेलोंडे यांनी केले. त्यानंतर रासेयोचे स्वयंसेवक चंदन गेडाम, वैभव पंचभाई, प्रतीक बजाईत, विकास साळवे, मिथुन तिरकुटे यांनी हागणदारी मुक्तीवर पथनाट्य सादर केले. निलता खंडाळकर आणि स्नेहल भोयर यांनी देशभक्तिपर गीत व नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे संचालन शीतल पाटणकर हिने केले.

पोलिसांची कुमक तैनात करण्यात आली होती.

• सामाजिक संघटनांनी पर्यावरणाच्या रक्षणार्थ मूर्ती दा
आदी उपक्रम राबविले.

लोकमत-८/८/१४

# रासेयो पथकाची स्थापना

**देवळी :** स्थानिक एस.एस.एन.जे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना शैक्षणिक सत्र २०१४-१५ तील पथकाची स्थापना करण्यात आली. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. गोपाल हेलोंडे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. महेश रंगारी, माजी विद्यार्थी प्रशांत कुमरे, प्रवीण पाटील, आमोद कुर्जेकार, विपूल ताडाम, प्रवीण कामडी, विशाल धपके, स्वप्नील राऊत, आशिष गावंडे, संदीप पाटील, ज्योती गुढे उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना हेलोंडे यांनी रासेयोचा मंच हा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी असून या माध्यमातून स्वत:चा व समाजाचा विकास करु शकतो. युवक-युवती हे देशाच्या विकासात महत्त्वाचा घटक आहे. यानंतर पथकाची स्थापना करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन स्वयंसेविका श्रद्धा ठाकरे हिने तर आभार लीनता खंडाळकर हिने मानले. यावेळी मोठ्या संख्येने स्वयंसेवक उपस्थित होते.(प्रतिनिधी)

# गुरु
# चिंत

चर्चा : तुक

**वर्धा :** अखिल भ
मंडळ यांच्यावतीने
विकास परीक्षा'
येतो. या माध
महाराजांचे वि
पोहोचविण्यात ये
नि:शुल्क प्रवेश अ
प्रचार आणि प्र
गुरुदेव सेवकां
घेण्यात आले.

यावेळी परी
गुलाब खवसे,
महाराज वाघ, प्र
दामोदर पाटील,
पुनसे, जिल्हा सेव
यांनी प्रबोधन केले
वाघ म्हणाले,
महाराजांचे सा
आणि राष्ट्रविका
'आपल्या लोकां

देशोन्नती

३ | वर्धा,
सोमवार, दि.१३ ऑक्टोबर २०१४

माणूस आणि
सणारे नाते हा
भगवान बुध्द
ग्रंथाचे वाचन
डॉ. बाबासाहेब
नव भारत' या
ात येत आहे.

कठाणे हिने मानले. मराठी अभ्यास मंडळाचे कार्यकारिणी मध्ये अध्यक्ष मयुरी करनाके, सचिव आरती इंगळे, सदस्य म्हणून सुविधा बेसेकर, रेश्मा निरगुडे, आरती भगत, अश्विनी खोडे, पुजा लोहकरे आदींची नियुक्ती करण्यात आली या सर्व सभासदाचे अभ्यास मंडळातर्फे अभिनंदन व स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाकरीता प्रा.ज्ञानेश्वर बहुरुपी, प्रा. कातोडे,प्रा.उपरीकर, प्रा.रोंगे,प्रा.समर्थ आदि सर्व प्राध्यापक उपस्थित होते.



दारूबंदी जिल्ह्यात अनेक
प्रमाणात धाडी टाकू

# मतदार जनजागृती अभियान

## एन.सी.सी.,एन.एस.एन.ज़े.व शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग

प्रतिनिधी/ १२ ऑक्टोबर

वर्धा : विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात नागरीकांनी मतदान करावे व लोकशाही भक्कम करावी, हा उद्देश समोर ठेवून जिल्हा प्रशासनातर्फे लोकजागृती अभियान ठिकठिकाणी आयोजित करण्यात येत आहे.



या उपक्रमाचा एक भाग म्हणून देवळीच्या एन.एस.एन.जे. महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना पथक, राष्ट्रीय सेवा योजना पथक व जनता हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नुकत्याच संपन्न झालेल्या मतदार जानजागृती अभियानात भाग घेवून विविध उपक्रमाच्या माध्यमातून जागृती केली. या निमित्य स्थानिक बस स्टँडपासून शहरातील मुख्य चौकातून रॅलीच्या माध्यमातून व पथनाट्यांच्या माध्यमातून एन.सी.सी. छात्रसैनिकांनी व एन.एस.एस. स्वयंसेवकांनी नागरीकांनी मतदान करण्याचे आवाहन केले. रॅलीचा समारोप स्थानिक श्यामसुंदर अग्रवाल धर्मशाळा येथे करुन सर्व उपस्थितीतांनी मतदान करण्याची व इतरांना मतदान करण्यासाठी प्रेरणा देण्याची शपथ घेतली. समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते मोहन अग्रवाल तर अतिथी म्हणून जिल्हा नियोजन अधिकारी प्रकाश डायरे, गृहरक्षक दलाचे जिल्हा समादेशक तथा एन.सी.सी.अधिकारी प्रा.मोहन गुजरकर, जिल्हा माहिती अधिकारी अनिल गडेकर, माजी उपअभियंता के.आर.बजाज, जनता हायस्कूल व. कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य एकनाथ येसनकर, राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.गोपाल हेलोंडे, डॉ.गणेश मालधुरे, प्रा.अमित चिनेवार, क्रिडा शिक्षक प्रशांत भुते, प्रशांत कुमरे, प्रा.प्रवीण पाटील व देवळी विभागाच्या नोडल अधिकारी उगेमुगे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता अंडर ऑफीसर आश्विनी घोडखांदे, अंडर ऑफीसर सचिन वैद्य,सार्जेंट रविंद्र बकाले, सार्जेंट रिना वायरे, अमोल अंतुरकर, प्रशांत खोब्रागडे, सुरज पोटफोड, राहूल वैद्य यांच्यासह एन.सी.सी. व एन.एस.एस. स्वयंसेवकांनी प्रयत्न केले.

पुलगाव, ता. १२ : इंडियन मि
मनोज भेंडे, कृष्णा कडू तसेच
भोजने होते. प्रथम मान्यवरांचे
देण्यात आली. सांस्कृतिक का
देण्यात आला. संचालन संजय

# सामाजिक कार्याकरिता युवकांनी पुढे यावे

## जी. के. वासेकर : देवळी पोलिस ठाण्यात समाजप्रबोधन

देवळी, ता. १२ : युवकांमध्ये फार मोठी शक्ती असते, मात्र या शक्तीचा विधायक वापर समाजाकरिता झाला तरच आजचे निराशाजनक चित्र बदलू शकते, असे प्रतिपादन पोलिस अधिकारी जी. के. वासेकर यांनी व्यक्त केले.

एस.एस. एन. जे महाविद्यालयातर्फे भिडी येथे आयोजित केलेल्या रासेयो शिबिरात मार्गदर्शक म्हणून बोलत होते. मंचावर प्राचार्य डॉ. एस. आर. उपाध्याय, तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक शंकर फरकाडे, उपसरपंच नितीन दिघाडे, पोलिस पाटील विजय देवतळे, सुरेश डफळे, बंडू पाटील डफळे, प्रा. गोपाल हालोंडे व अन्य मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात विविध विषयांवर मान्यरांनी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक फरकाडे म्हणाले, विद्यार्थ्यांनी गावात जागृती सादर क केले. आयोजनाकरिता प्रा. माधुरी देशमुख, प्रा. संजय तऱ्हेकर, प्रा. डॉ. गणेश मालधूरे, प्रशांत कुमरे, विक्की पांडे, विपूल ताडाम, प्रवीण कामडी, सचिन बीरे, आशिष गावंडे, संदीप पाटील, स्वप्नील राऊत, विशाल थपके, नितिन वानखेडे व अन्य मान्यवर उपस्थित होते. संचालन श्रद्धा ठाकरे यांनी केले. आभार पल्लवी विजवार यांनी केले.

# न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये युवा संमेलन

**सकाळ वृत्तसेवा**

वर्धा, ता. १२ : सफल युवा, भारत अभियानांतर्गत एक दिवसीय अनिवासी युवा संमेलन विवेकानंद केंद्र कन्याकुमारी केंद्र शाखा यांच्यावतीने स्थानिक न्यू इंग्लिश हायस्कूल सभागृह घेण्यात आले.

त्यात महाविद्यालयीन युवक-युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. उद्घाटन प्रकाश बोबटकर, विजय काळबांडे यांच्या हस्ते पार पडले. पहिल्या सत्रात 'उद्दीष्टपूर्ण जीवन आणि मी कोण?' या विषयावर तरुणांनी चर्चासत्रात सहभाग घेतला. उपस्थित मान्यवरांनी सदर विषयीची व्याप्ती स्पष्ट केली. दुसऱ्या सत्रात 'सफलता ते सार्थकता आणि कृतिशीलता' या विषयावर नागपूर येथील विवेकानंद केंद्राचे महाविद्यालयीन प्रमुख लखेश्वर चंद्रवंशी यांनी प्रबोधन केले. त्यात समर्थ भारत घडविण्याकरिता विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव व आत्मविश्वास जागृत केला.

अंतिम सत्रात भारतीय संस्कृती परिक्षेमध्ये उत्तीर्ण युवक-युवतींना बक्षिसांचे वितरण प्राचार्य विजय व्यास, माजी प्राचार्य हेमा बोरकर यांच्या हस्ते करण्यात आले. या संमेलनाला प्रमोद बोरकर, अमोल गोढकर, डॉ. अशोक गावंडे, प्रभाकर खोडे, प्रशांत दुधाणे, प्रियमवंदा पांडे, धर्मेंद्र पवार उपस्थित होते. संचालन विशाल दादुरवाडे यांनी केले. आभार निखिल राजकुवर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी चारुदत्त हरिदास, आकाश पत्की, प्रयास तुरखाडे, तुषार मेश्राम, योगेश चिंचोळकर, विपिन वैद्य, ओम बारेवार यांनी सहकार्य केले.

# रासेयोचे भिडी येथे श्रमसंस्कार शिबिर

## एस.एन.जे महाविद्यालयाचा उपक्रम

*तालुका प्रतिनिधी /२४ डिसेंबर*

**देवळी** : स्थानिक एस.एन.जे.महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि जिल्हा परिषद यांच्या संयूक्त विद्यमाने स्वच्छतेसाठी युवक या संकल्पनेवर आधारित आठ दिवसीय विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीर नूकतेच भिडी येथे पार पडले.



अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.आर.उपाध्याय होते. उद्घाटक म्हणून तहसिलदार जे.पी.कुंवर होते. अतिथी म्हणून रासेयोचे प्रा.प्रशांत जाधव उपस्थीत होते. तहसीलदार कुंवर म्हणाले की, ग्रामीण भागात अशा प्रकारच्या शिबिरांमुळे भोळ्या-भाबड्या ग्रामस्थांना आपल्या आरोग्या विषयी, आपल्या न्याय्य हक्कांबाबत, स्वच्छतेबाबत उचित मार्गदर्शन होऊन आजचे युवक-युवती त्यांच्याशी जुळु शकतात, ग्रामस्थांना एक नामी संधी या शिबिरांमुळे उपलब्ध झालेली असल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. प्रशांत जाधव म्हणाले, म.गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वैराग्यमुर्ती गाडगेबाबा यांचे ग्राम विकासातील योगदान लक्षात घेवून युवक व बाल कल्याण मंत्रालयाद्वारे सुरु केलेले रासेयो हे सामाजिक बांधीलकी जपणारा एक आदर्श मंच आहे, याद्वारे अनेक चांगले उपक्रम महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांनी राबविले आहेत, सामाजिक दृष्ट्या उपयोगी असे प्रकल्प स्वयंसेवकांनी हाती घेतल्याने ज्या उद्देशाने हा विभाग सुरु केलेला आहे. पंचायत समिती सदस्य श्रीधरराव लामे आपल्या भाषणात म्हणाले, आजचे महाविद्यालयीन युवक-युवती समाजसेवेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सुरु केलेले रासेयोचे कार्य हे खरेच कौतुक करण्यालायक आहे. या शिबिराचा गावकऱ्यांनी मनापासून लाभ घ्यायला हवा. प्राचार्य डॉ. उपाध्याय म्हणाले की, आमच्या महाविद्यालयाच्या मार्फत वर्षभर विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येतात, त्यापैकी एक मुख्य उपक्रम म्हणजे हे शिबिर असल्याचे ते म्हणाले. प्रा. गोपाल हेलोंडे यांनी या आठ दिवसीय शिबिरामध्ये कोण-कोणते उपक्रम राबविणार आहेत याची माहिती दिली, आरोग्य व रक्तदान शिबिर, महिला मेळावा, ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण, अंधश्रध्दा निर्मुलनार्थ विविध पथनाट्य, तसेच मनोरंजनातून प्रबोधन आदी कार्यक्रमांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी नवनिर्वाचित रासेयो जिल्हा समन्वयक प्रा. जाधव यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विनोद खोब्रागडे, नितेश डोफे, अमित गावंडे, प्रा. एम.पी.देशमुख, प्रा. डॉ. गणेश मालधुरे, प्रशांत कुमरे, प्रा. प्रविण पाटिल, विपुल ताडाम आशिष गावंडे, प्रविण कामडी, संदिप पाटील, विशाल थपके, स्वप्नील राऊत, सचिन बिरे, संजय तऱ्हेकर, रासेयो चे आजी व माजी विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नंदोरी येथे विदर्भस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन

*वार्ताहर /२४ डिसेंबर*

**नंदोरी :** स्व.बिहारी जरिले यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विदर्भस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन नंदोरी (जाम) येथे ३ ते ४ जानेवारीला आयोजित करण्यात येणार आहे. सार्वजनिक व्यायाम प्रसारक मंडळ नंदोरी येथील प्रांगणात या स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल. खुल्या गटात कबड्डीचे सामने पार पडणार आहे. स्पर्धेत विदर्भातील संघ सहभागी होणार असून विजेत्या संघाला प्रथम पारितोषिक २० हजार रु.रोख व चषक तर उपविजेत्याला १५ हजार रोख व चषक,तर तिसऱ्या स्थानावरील संघासाठी ७ हजार व चषक देऊन विजेत्याला गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेमधील अंतिम सामन्यामधील मॅन ऑफ द मॅच ,मॅन ऑफ द सिरीज,बेस्ट कोच व बेस्ट रेडर, पब्लीक चॉइस, अंतिम सामन्यातील विजेत्यांना बक्षीस देण्यात येईल. हे सामने विदर्भ असोसिएशन नियमानूसार खेळविण्यात येईल. यशस्वीतेकरीता सचिन हिवरकर, अमोल सुमटकर, सुहास वाघमारे, विशाल हांडे, गुणवंत टेंभरे, विनोद कुटे, अमोल छापेकर, चेतन छापेकर, चिंतामण कुटे, गणेश वैद्य, श्रीकांत सुमटकर, राहुल शेंडे, महादेव वैद्य यांनी परीश्रम घेतले.

३ वर्धा, रविवार, दि. ३० नोव्हेंबर २०१४ देशोन्नती

# डेंग्यू आजाराबाबत जनजागृती कार्यक्रम

## एस.एस.एन.जे. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचा उपक्रम

*तालुका प्रतिनिधी/ २९ नोव्हेंबर*

**देवळी :** देवळी तहसील परिसरातील अनेक गावांमध्ये सध्या डेंग्यू या आजाराने थैमान घातलेले आहे. या आजारावर हमखास असा इलाज अनेक रुग्णालयांमध्ये उपलब्ध नाहीत त्यामुळे या आजाराची लागण झालेल्या अनेक पीडितांना आपले प्राण गमवावे लागलेले आहे. समाजसेवेचे व्रत घेवून काम करणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या मार्फत या संदर्भात काही करता येते काय, याचा विचार करुन स्थानिक एस.एस.एन.जे. महाविद्यालयातील रा.से.यो. विभागाने ग्रामीण भागात जावून यासंदर्भात ग्रामस्थांना मार्गदर्शन करणे सुरु केलेले आहे.

कार्यक्रम अधिकारी प्रा.गोपाल हेलोंडे ह्यांच्या मार्गदर्शनात रासेयोच्या स्वयंसेवकांचे वेगवेगळे गट तयार करुन हे गट देवळी परिसरातील नांदोरा, अंजी- अंदोरी, भिडी, बोपापूर, दिघी, डिगडोह, चिकनी, जामणी इत्यादी गावात सायंकाळच्या वेळी ग्रामस्थांना एकत्रित करुन डेंग्यू या आजारबाबत जनजागृती करुन तो होणार नाही यासाठी घ्यावी लागणारी दक्षता याविषयी त्यांना माहिती देण्याचे कार्य करीत आहेत, यामहितीमध्ये डेंग्यू हा आजार विशेष प्रकारच्या डासांपासून कसा पसरतो, स्वच्छ पाण्यात या डासाची मादी अंडी देते ज्यामुळे त्यांची पैदास मोठ्या संख्येने वाढते, तसेच हे डास विशेषता दिवसा चावतात, चावणारे डास हे मादी प्रकारातील असतात ज्यामुळे डेंग्यू आजाराची लागण होते, बाधीत व्यक्तीच्या रक्तातील पांढऱ्या पेशी वेगाने कमी होतात, योग्य उपचार मिळाला नाही तर रुग्णाचा मृत्यू सुद्धा होतो. यावर एकच उपाय म्हणजे योग्य प्रकारची काळजी घेणे. पाणी जास्त दिवस साठवून ठेवू नये, आजूबाजूला साचलेले पाणी प्रवाहीत करावे, पिण्याच्या पाण्याचे भांडे तसेच पाणी साठवणूक केलेले टाके आठवड्यातून एक दिवस कोरडे करुन उन्हात सुकवावे, ताप आला किंवा अस्वस्थता वाढलीतर ताबडतोब रुग्णालयात गेले पाहिजे इत्यादि प्रकाराची माहिती गावकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी कामगिरी रासेयोचे स्वयंसेवक उत्साहात करीत आहेत, ज्याचा चांगला परिणाम या भागात दिसून येत आहे. विद्यार्थ्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

या कार्यक्रमामध्ये त्यांना मदत करण्याचे कार्य प्रा.प्रविण पाटील, प्रा.प्रशांत कुमरे, आशिष गावंडे, विपूल ताडाम, संदीप पाटील, स्वप्नील राऊत करीत आहेत.

सकाळ वर्धा, शुक्रवार, २६ डिसेंबर २०१४ ४

# भिडी येथे श्रमसंस्कार शिबिर

सकाळ वृत्तसेवा

वर्धा, ता. २५ - देवळी येथील एसएसएनजे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि जिल्हा परिषदेद्वारे स्वच्छतेसाठी युवक या संकल्पनेवर आधारित भिडी येथे श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. आर. उपाध्याय होते. उद्घाटक तहसीलदार जे. पी. कुवर होते. प्रा. प्रशांत जाधव, श्रीधर लाभे, नारायण देवतळे, राजाभाऊ रोकडे, महेश देवतळे आदींची उपस्थिती होते. श्री कुवर म्हणाले, ग्रामीण भागात अशा शिबिरांमुळे ग्रामस्थांना आपल्या आरोग्याविषयी, न्याय हक्कांबाबत आणि स्वच्छतेबाबत माहिती मिळते. शिबिराच्या माध्यमातून ग्रामस्थांना चांगली संधी उपलब्ध झाली आहे, असेही ते म्हणाले. प्राचार्य डॉ. उपाध्याय म्हणाले, महाविद्यालयातर्फे वर्षभर विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येतात, त्यापैकी शिबिर होय. कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रशांत जाधव यांनी प्रास्ताविकातून शिबिराची भूमिका विशद केली.

शिबिरात आरोग्य, रक्तदान शिबिर, महिला मेळावा, ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण, अंधश्रद्धा निर्मूलन, पथनाट्य आदी कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

यावेळी विनोद खोब्रागडे, नीतेश डोफे, अमित गावंडे, एम. पी. देशमुख, गणेश मालधुरे, प्रशांत कुमरे, प्रवीण पाटील, विपुल ताडाम, आशीष गावंडे, प्रवीण कामडी, संदीप पाटील, विशाल धपके, स्वप्नील राऊत, सचिन बोरे, संजय तऱ्हेकर व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

जनजागृता मंच स्थापन करण्यात आला आहे.

बोरगाव (मेघे) परिसरात डेंगीचा फैलाव रोखण्याकरिता मंचाच्या वतीने, घरगुती आणि सार्वजनिक शौचालयाच्या पाण्यात ... वद्यकाय व्यावसायिकांव्यतिरिक्त इतर व्यक्तींनाही यात योगदान द्यायचे असल्यास, निःस्वार्थ सेवा करायची असल्यास मंचाचे सदस्य होऊ शकता, असे संघटनेतर्फे डॉ. सचिन पावडे यांनी कळविले आहे.

गांडोळे, डॉ. प्रशांत वाडिभस्मे, डॉ. सतीश हरणे, डॉ. राजेश आसमवार, डॉ. राधाक्रिष्णा सायरे, डॉ. राजेश सरोदे, डॉ. अभिजित खणके आणि डॉ. विनय शादिजा यांचा सक्रिय सहभाग आहे.

कोशाध्यक्ष ... उद्योग कें... एनर्जी सेंट... समन्वयक ...



दै. सकाळ - ३०/११/१४

# डेंगी आजाराबाबत जनजागृती मोहीम

देवळी, ता. २९ : एस.एस.एन.जे. महाविद्यालयातर्फे डेंगी आजाराबाबत जनजागृती मोहिम सुरू करण्यात आली. रासेयो विभागाच्या विद्यार्थ्यांनी गावात जाऊन या आजारापासून काळजी कशी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन करत आहेत.

कार्यक्रम अधिकारी प्रा. गोपाल हेलोंडे यांच्या मार्गदर्शनात वेगवेगळे समूह तयार करून नांदोरा, बोपापूर, अंजी अंदोरी, भिडी, दिघी, डिगडोह, चिकणी, जामनी या गावात सायंकाळच्या सुमारास जाऊन डेंगी आजाराची माहिती देत आहेत. पिण्याचे पाणी ज्यात साठवले जाते ते भांडे स्वच्छ ठेवावे, आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस म्हणून पाळावा, तापाचा लक्षणे दिसून आल्यास त्वरित डॉक्टरांकडे जाऊन उपचार करावे, असे आवाहन विद्यार्थी करत आहेत. या उपक्रमाला प्रा. प्रवीण पाटील, प्रा. प्रशांत कुमरे, आशिष गावंडे, विपुल ताडाम, संदीप पाटील, स्वप्नील राऊत मार्गदर्शन करत आहेत.

वर्धा : उ...

पान १ वरून

## दातृत्वाचा हृद्य अन् समृद्ध सोहळा

शिष्यवृत्तीचे प्रमाणपत्र घेताना एका मुलीला लीला पूनावाला यांच्या पायावर डोके टेकवताना अश्रू अनावर झाले. लीला पूनावाला यांनीच तिला अश्रू गाळायचे ...

सकाळ

... शकते. परंतु त्यासाठी पाहिजे इच्छाशक्ती व समाजाप्रति समर्पणाची भावना!

... वाहतुकीची या मार्गाने वर्दळ असते. ग्रामीण रुग्णालय, पोलिस ठाणे या ...

... यावेत, अशी मागणीही नागरीकांद्वारे करण्यात येत आहे.

दै. देशोन्नती - १५/३/१५

# महिलाच चांगले संस्कार रुजवू शकतात : डॉ.उपाध्यक्ष

*प्रतिनिधी / १४ मार्च*

वर्धा : आज स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडीत आहेत. स्त्रियांना पुढे जाण्याकरिता त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. सामाजिक समस्यांवर मात करण्यासाठी तरुण पिढीवर योग्य संस्कार घडविण्याची गरज आहे. आणि महिलाच चांगले संस्कार रुजवू शकतात, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.सुरेश उपाध्याय यांनी नुकत्याच पार पडलेल्या जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

देवळीच्या एसएसएनजे महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त कायक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सुरेश उपाध्याय तर प्रमुख अतिथी म्हणून कब-बूलबूलच्या सहयक जिल्हा आयुक्त व फ्लाक लिडर निर्मेला नंदूरकर, मराठी विभाग प्रमुख



डॉ.गणेश मालधुरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.गोपाल हेलोंडे व एन.सी.सी.अधिकारी लेफ्टनंट प्रा.मोहन गुजरकर उपस्थित होते.

युवक -युवतीपुढे आदर्श ठेवण्याची आज नितांत गरज असून सुसंस्कारीत व देशभक्तीने भारवलेली तरुणाईच महिलांना तसेच समाजाला सुरक्षा प्रदान करु शकेल, असे मनोगत नांदूरकर यांनी आपल्या मार्गदर्शनात व्यक्त केले. याप्रसंगी कॅडेट अंडर ऑफीसर पूजा भगत, तेजस्विनी फटींग व मोनिका महाजन या विद्यार्थीनींनी आपले विचार मांडले. यावेळी अतिथींच्या हस्ते निर्मला नंदूरकर व नुकत्याच गृहरक्षक दलात सामिल झालेल्या ज्योती गुढे, रश्मी सायंकार व प्रियंका समर्थ यांना गौरविण्यात आले.

प्रास्ताविक प्रा.हेलोंडे यांनी केले. संचालन ज्योती गुढे हिने तर आभार दिनेश सावरकर याने मानले. कार्यक्रमाची सांगता 'हम सब भारतीय है... या एन.सी.सी. गीताने झाली.

...पदी

...राऊत, तारेश ...णवाळे, दत्ता ...व प्रा.विनोद प्रशांत ढोले, ...ड करण्यात ... समिती ...ल भारतीय सर्वाधिकारी प्रचार प्रमुख सर्वाधिकारी ...तिस जनार्धन ...ले आहे.

...कूळ

...कुलूप तोडून ...यत्न केला. ...याचे लक्षात ...दिवशी दुपारी ...हेरगावाहून ...प तोडलेले ...वस्थेत होते. ...यात आली.

# बुरसटलेल्या वाईट विचारांची करा होळी...

होळी हा माहेर वासिनींचा आनंदाचा सण आहे, परंतु आजच्या स्थितीत या सणाचे स्वरूप पूर्णतः बदललेले आहे. होळी या सणाकडे बघताना आपल्याला भक्त प्रल्हादाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. याची ऐतिहासिक, पुराणिक, कथा अशी आहे, प्रल्हाद हा हिरण्यकश्यप राजाचा मुलगा प्रल्हाद विष्णूभक्त होता. हिरण्यकश्यप